MHBU130001912024

रे.दि.मु.क्र. १६/२०२४
रमेश –वि– विजय

**आदेश निशाणी क्र.३३ वर**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.२ सांगतात की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ चे लेखी जबाबातील कलम १० मध्ये तिस–या व चौथ्या ओळीत "वादी क्र.१" हा शब्द कमी करुन तेथे "प्रतिवादी क्र.१" हा शब्द टाकून दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादी करतात.

०३. वादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे मागविण्यात आले. वादीतर्फे विधिज्ञांनी सदर अर्जावर योग्य तो आदेश पारीत करण्याबाबत आदेशीत केले आहे.

०४. प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर होवून मिळणे बाबत व कायमचा मनाई हुकूम मिळणे बाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र. २८ वर लेखी जबाब दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ च्या कथनानुसार लेखी जबाबाच्या परीच्छेद १० मध्ये टाईपिंगची चूक झालेली आहे. सबब, प्रतिवादी करु इच्छीत असणारी दुरुस्ती टाईपींगची चूक सुधारणे बाबत आहे. प्रस्तुत अर्जाच्या कथनांच्या पृष्टर्थ प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिज्ञालेख दिला आहे. तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये पुरावा देण्यास सुरवात झालेली नाही. सदर अर्जास वादीने विरोध केलेला नाही. सदर अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार नाही. तसेच दाव्यातील सर्व कथनांची सत्यता पुराव्याअंती ठरत असते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास दाव्यावर परिणाम होणार नाही. तसेच वादीच्या

हक्कांवरही परिणाम होत नाही. सबब, प्रतिवादी क्र. २ चा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी विवेचनाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती विहित मुदतीत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI

Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.04.21 11:32:48 +0530

दिनांक : १९.०४.२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, चिखली.